# सर्वपक्षीय जाहीरनाम्यातील अन्नसुरक्षा व कृषि विकास संबंधी सहमती

**- राहुल बैस**

सोळाव्या लोकसभेत जास्तीत जास्त प्रतिनिधीत्व मिळविण्यासाठी भारतातील ७०० पेक्षा जास्त राजकीय पक्ष पूर्ण ताकदीने एप्रिल-मे २०१४ मधील सार्वत्रिक निवडणुकीत सहभागी झाले आहेत. राजकीय पक्षांचे एकमेकांवरील आरोप-प्रत्यारोप, स्वतःची वारेमाप स्तुती, आणि मतदारांना विविध प्रलोभने किंवा आश्वासने यांनी भारतातील जनमानस ढवळून निघाले आहे. अश्या गदारोळातील परिस्थितीतही काही विधायक कृतीची घोषणा राजकीय पक्षांना करावीच लागते. त्याच अनुषंगाने सन २०१४ ते २०१९ या पंचवार्षिक कालावधीसाठी राजकीय पक्षांची ध्येय-धोरणे आणि कृती आराखडा दर्शविणारे जाहीरनामे प्रकाशित होत आहेत.

आपल्या देशाचा अधिकाधिक विकास साधण्यासंबंधी राजकीय पक्षांची भूमिका समजून घेता यावी यासाठी नमुनादाखल चार पक्षांच्या इग्रंजी भाषेतील जाहीरनाम्याचे वाचन करण्यात आले. यातील 'भारतीय राष्ट्रीय काँग्रेस', 'भारतीय जनता पक्ष', आणि 'कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सिस्ट)' हे तीन पक्ष राष्ट्रीय स्तरावरील राजकीय पक्षांच्या आघाडीचे नेतृत्व करीत आहेत. 'आम आदमी पार्टी' नव्याने स्थापन झालेली आणि वरील तीन पैकी कोणत्याही पक्षाच्या नेतृत्वातील आघाडीत सामील होणार नसल्याची स्पष्ट घोषणा केलेली आहे. त्यामुळे या चार पक्षांच्या जाहीरनाम्यातून भारतातील समस्त राजकीय पक्षांची अन्न सुरक्षा व कृषि विकास संदर्भातील भूमिका समजून घेण्याचा हा एक मर्यादित प्रयत्न आहे.

**राष्ट्र हितासाठी सर्वपक्षीय सहमती व बांधिलकी**

चारही जाहीरनाम्यातील साम्यस्थळे लक्षात घेतली तर 'निवडणूक ज्वर' डोक्यात शिरलेला कोणीही व्यक्ती पटकन आरोप करेल की अमूक पक्षाने तमूक पक्षाचा जाहीरनामा चोरला किंवा कॉम्प्युटरच्या भाषेत म्हणायचे तर 'कॉपी-पेस्ट' केला आहे. परंतु सामान्य भारतीय नागरिकाला हे सहज कळण्यासारखे आहे की राष्ट्र हिताचे मुद्दे सर्व पक्षांकरीता सारखेच राहणार आहेत.

राष्ट्र हिताच्या मुद्द्यांप्रती चिंता आणि ते सोडविण्यासाठी मार्गांची उकल आपआपल्या पद्धतीने सर्व पक्षांनी करायलाच हवी. पक्षांच्या जाहीरनाम्यातून ते प्रकट होत आहे. भारतीय नागरिकांसाठी ही अत्यंत समाधानाची बाब आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी एका भजनातून देवाला करूणा भाकलेली आहे "सब नेताओं में कर दे मिलन ... उंचा उठा दे मेरा प्यारा वतन". आता देशाला उंच प्रगतीपथावर नेण्याच्या निमित्त्यानेच सर्व नेत्यांच्या जाहीरनाम्यात तरी मिलन झाल्याचे आढळून येत आहे.

दि. १६ मे २०१४ रोजी निवडणुकीचा निकाल लागल्यावर, सोळाव्या लोकसभेत वरील उल्लेखित चार राजकीय पक्ष किंवा त्यांचेशी संबंधीत आघाडीतील पक्षांचे सदस्य किंवा अपक्ष प्रतिनिधी राहणार आहेत. यांचेमधूनच एक व्यक्ती पंतप्रधान बनेल आणि त्याचे मंत्रीमंडळ असेल म्हणजे जाहीरनाम्यांतील साम्यस्थळांच्या आधारे विचार केल्यास सोळाव्या लोकसभेतील सर्व सदस्य व भारताचे भावी पंतप्रधान यांचे मिळून काही 'समान किमान कार्यक्रम' (कॉमन मिनिमम प्रोग्रॅम) जाहीरनामांच्या आधारे तयार आहे, असे समजण्यास हरकत नाही.

पुढील पाच वर्षात लोकसभेसाठी निर्वाचित हे सर्व जनप्रतिनिधी एकदिलाने राष्ट्र हिताच्या काही विशिष्ट मुद्द्यांची सोडवणूक करतील किंवा 'समान किमान कार्यक्रम' अमंलात आणतील अशी अपेक्षा आपण समस्त भारतीय नागरिकांनी करायला हवी.

अन्नसुरक्षा व कृषि विकास संदर्भातील सर्वपक्षांना मान्य मुद्द्यांची चर्चा येथे सुरू करण्यात येत आहे

**जीडीपी वाढ**

भारताच्या आर्थिक विकासाची स्थिती मोजण्याचे एक सूचकांक 'देशांतर्गत सकल उत्पाद' (ग्रॉस डोमेस्टिक प्रॉडक्ट - जीडीपी) वाढवू अशी सर्वपक्षांनी घोषणा केली आहे.

विशिष्ट कालावधीत (साधारणपणे एका कॅलेण्डर वर्षात) देशांतर्गत उत्पादित सर्व अंतीम वस्तू आणि सेवा यांचे एकुण बाजार मूल्य म्हणजे 'देशांतर्गत सकल उत्पाद' (जीडीपी) होय. ते खालील सूत्रातून समजून घेतले जाते

जीडीपी = उपभोग + एकुण निवेश + सरकारी खर्च + (निर्यात - आयात)

आपल्या देशात कृषि क्षेत्रातील जीडीपी किमान ४ टक्के असावा अशी अर्थशास्त्रींची धडपड असते. परंतु वास्तविक ते २ ते ३ टक्के पेक्षा पुढे जात नाही. याचे कारण जीडीपी च्या सूत्रातून स्वयंस्पष्ट आहे

आपल्या देशात कृषि उत्पादचे उपभोग कमी किंवा मर्यादित आहे. साठवणुकीची व्यवस्थित सोय नसल्याने आपण दरवर्षी ५८ हजार कोटी रूपयांच्या अन्नधान्याची उगीचच नासाडी करतो. त्याचवेळी कोट्यावधी जनतेला अन्नधान्याविना अर्धपोटी झोपायला भाग पाडतो.

सिंचन, साठवणूक, बाजार, इत्यादि सुविधांच्या बाबतीत कृषि क्षेत्रात पुरेसा सरकारी निवेश करण्यात आलेला नाही. कृषि क्षेत्रातील निवेश वाढविण्यासाठी अदांजपत्रकीय (बजेट) सोय खुप कमी असते.

आपल्या कृषि क्षेत्राची निर्यात क्षमता अतिशय कमी आहे. मागील महिन्यात युरोपियन बाजार संघाने आपल्या फळभाज्या व अन्य शेतीमालाच्या गुणवत्तेवर आक्षेप घेत त्यावर बंदी घातली यामुळे आपली आधीचीच कमजोर निर्यात क्षमता अधिक कमजोर झाली.

याचवेळी आपली कृषि क्षेत्रातील आयात भरपूर आहे. खतांच्या बाबतीत आपली वार्षिक गरज साधारणपणे ५ लक्ष टन आहे. यातील केवळ जवळपास २ लक्ष टन खत निर्मीती देशात होते. बाकी सर्व गरज आयातीतून पूर्ण केली जाते. हीच परिस्थिती शेतीला आवश्यक अन्य घटकांच्या बाबतीतही आहे. याशिवाय सार्वजनिक वितरण व्यवस्थेकरीता पंजाब-हरियाणाचे शेतकरी मागणी करीत असलेले गव्हाचे भाव महाग असल्याचे सांगून वैश्विक निविदेतून ऑस्ट्रेलिया मधून शेतकऱ्यांनी केलेल्या मागणीपेक्षा जवळजवळ दुप्पट भावाचे गहू आयात करण्यात आल्याचे अलीकडचे उदाहरण आहे. जीडीपी वाढीसाठी खरे तर आयात अतिशय कमी असणे जरूरीचे आहे.

आजचे कृषि क्षेत्रातील जीडीपी दर वास्तविक कृषि मंत्रालय व संबंधीत प्रशासकीय यंत्रणेवर केले जाणारे भरमसाठ सरकारी खर्चावर अवलंबून आहे.

कृषि क्षेत्रातील उपभोग, निवेश, आणि निर्यात कडे दुर्लक्ष करून फक्त सरकारी खर्च आणखीन वाढवून कृषि क्षेत्रातील जीडीपी दर वाढविता येईल. पण सरकारी खर्च वाढवून जीडीपी दर वाढविण्याचा 'चमत्कार' सोळावी लोकसभा किंवा त्यातील सत्ताधारी राजकीय पक्ष करणार नाही, याची आम्हां भारतीयांना खात्री हवी.

**अन्नसुरक्षा**

'वैश्विक भूक सूचकांक' (ग्लोबल हंगर इंडेक्स) मध्ये भारताची क्रमवारी अतिशय खालची आहे. भूकबळी आणि त्यातही मुख्यतः कुपोषण बळींची संख्या भारतात जास्त आहे. स्वाभाविकपणे अन्नसुरक्षा सर्व पक्षांना महत्त्वाचा मुद्दा वाटतो.

अलीकडेच संसदेने पारीत केलेल्या अन्नसुरक्षा कायदा द्वारे भारतातील अतिशय गरीब व्यक्तींची अन्नसुरक्षा सुनिश्चित करण्यात आल्याचा 'भारतीय राष्ट्रीय काँग्रेस'चा दावा आहे. यापलीकडे याविषयीचे अन्य कुठलेही भाष्य त्यांच्या जाहीरनाम्यात नाही.

'भारतीय जनता पक्ष', आणि 'कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सिस्ट)' यांना अन्नसुरक्षा कायद्याची व्याप्ती वाढवावीशी वाटते. अन्नसुरक्षेचा 'लक्ष्याधारीत' (टार्गेटेड) स्वरूप बदलून ते 'सार्वत्रिक' (युनिवर्सल) आणि 'भ्रष्टाचारमुक्त'

व्हावे, असा नवा कायदा घडविण्याची त्यांची घोषणा आहे. अन्नसुरक्षेत राज्यांचा सहभाग घ्यावे; डाळी, तेल, सारख्या पौष्टिक वस्तूंचा त्यात समावेश असावा; सामुदायिक स्वयंपाकगृह प्रोत्साहित करावे 'अन्न व वखार महामंडळ' (फुड कार्पोरेशन ऑफ इंडिया) ची व्याप्ती वाढवावी व नुतनीकरण करावे; इत्यादि मुद्दे या दोन्ही पक्षांना पटलेले दिसते

मोहल्लासभांच्या सहभागातून सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील भ्रष्टाचार संपविणे आणि राशि हस्तांतरण (डायरेक्ट कॅश ट्रान्सफर) ऐवजी कुटुंबांना डाळी, तेल, सारख्या पौष्टिक वस्तूंचाही समावेश असलेले रेशन वस्तू हस्तांतरण 'आम आदमी पार्टी'ला महत्त्वाचे वाटते.

अर्थात्, अन्नसुरक्षा कायद्याची व्याप्ती वाढविण्यास सोळाव्या लोकसभेत सर्वपक्षीय सहमती राहील अशी अपेक्षा करता येते. मात्र ही व्याप्ती वाढवितांना काही काळजीचे मुद्दे आणि काही विरोधाभास यांची दखल लोकसभेकडून घेतली जाणे जरूरीचे वाटते.

**भ्रष्टाचारमुक्त अन्नसुरक्षा**

आपण स्वीकारलेल्या आजच्या अन्नसुरक्षा व्यवस्थेत जाणवत असलेल्या त्रुटीतून नवीन व्यवस्था बनविण्यासाठी उपाय मिळू शकतो.

खुले बाजार, सार्वजनिक वितरण व्यवस्था (रेशन दुकान), आणि अन्नसुरक्षा कायदाअंतर्गत विशेष सुविधा, असे धान्याचे तीन प्रकारचे दर आज व्यवहारात आले आहेत

साहजिकच कमी दराचे धान्य जास्त दराच्या ठिकाणी विकले जाऊन भ्रष्टाचारास वाव मिळाला; आणि लक्षित समाज घटक पुन्हा अन्नसुरक्षेपासून वंचित होऊ लागला आहे

वेगवेगळ्या दराची धान्य विक्री व्यवस्था व्यवहारात असल्यास भ्रष्टाचारमुक्त अन्नसुरक्षा कधीही अस्तित्वात येऊ शकणार नाही. देशभरात एकाच दराची धान्य विक्री व्यवस्था असणे ही भ्रष्टाचारमुक्त अन्नसुरक्षा व्यवस्थेसाठीची पूर्वअट असेल.

**सार्वत्रिक अन्नसुरक्षा**

भारताच्या राज्यघटनेने नागरिकांना दिलेल्या जीविताच्या रक्षणाची हमी साधण्यासाठी सर्वांची अन्नसुरक्षा सुनिश्चित करणे ही सार्वकालिक स्वीकारण्यायोग्य संकल्पना आहे त्यामुळे अन्नसुरक्षेपासून कोणीही वंचित राहणार नाही हे सुनिश्चित होईल.

परंतु असे केल्याने क्रयशक्ति असलेले मध्यमवर्गीय व उच्चवर्गीय कुटुंबियांना देखील स्वस्त धान्याची सवलत मिळेल. हे सामाजिक न्यायाच्या दृष्टीने अयोग्य ठरेल. वास्तविक अशी सवलत वंचित समाज घटकांना मिळणे आपल्याला हवे आहे. त्यामुळे क्रयशक्ति असलेल्या घटक (आयकर लागू असलेले व्यक्ति) कडून 'फुड सेस' (अन्नासाठीचा विशिष्ट कर) वसूल करणे सामाजिक न्यायास अनुकूलतेचे होईल

**अन्नसुरक्षा आणि कामाची प्रेरणा**

सार्वत्रिक अन्नसुरक्षेतून शेतकरी आणि शेतमजूर या दोहोंच्या कामाच्या प्रेरणेवर परिणाम होणे संभवते

स्थानिक शेतकऱ्यांकडून ठराविक हमी भावात धान्य विकत घेण्यापेक्षा जागतिक बाजारपेठेतून वैश्विक निविदेच्या माध्यमातून धान्य विकत घेण्यासाठी अन्नसुरक्षा कायदामुळे सरकारला निमित्त्य मिळाले आहे यामुळे शेतकऱ्यांना होणाऱ्या नुकसानीचे प्रमाण वाढत जाईल

असे नुकसान सोसत शेती करण्यापेक्षा अन्नसुरक्षेचा लाभ घेत अन्य व्यवसायाकडे वळणे शेतकऱ्यांना कदाचित सोयीचे वाटू लागेल.

आजच्या स्थितीतच रेशन दुकानातून उपलब्ध कमी दराच्या धान्यामुळे आठवड्याची गुजराण करायला शेतमजुरांना आठवड्यातून दोन ते तीन दिवस कामाची मजुरी पुरेशी ठरत असल्याचे दिसते ऐन शेती हंगामातही मजूर

शेती कामावर येण्यास तयार नसल्याचे सर्रास आढळून येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची अन्नसुरक्षा योजनेबाबत स्पष्ट नाराजी आहे.

आठवड्यातून किमान पाच दिवस शेती कामावर हजर असल्याचे प्रमाणपत्र शेतकऱ्यांकडून मिळाल्याशिवाय संबंधीत शेतमजुराला अन्नसुरक्षा योजनेचा लाभ देण्यात येऊ नये, अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

शेतमजुरांची कमतरता शेती साठी मोठे संकट ठरू पाहत आहे

शेतकरी आणि शेतमजुरांच्या कामाच्या प्रेरणेवर विपरीत परिणाम करणार नाही अश्या अन्नसुरक्षेचा आपल्याला शोध घ्यावा लागेल.

**अन्नसुरक्षा आणि देशाचे सार्वभौमत्व**

आपल्याच शेतकऱ्यांच्या उत्पादनातून म्हणजे कृषि स्वावलंबनातून अन्नसुरक्षा की प्रसंगी परकीय धान्याचे आयात करून अन्नसुरक्षा, याबाबतीत हे सर्व जाहीरनामे खुलासा करीत नाहीत.

अन्नसुरक्षा हे कोणत्याही देशाच्या सार्वभौमत्वाशी निगडित मुद्दा आहे (पुरातन काळापासून युद्ध जिंकण्यासाठी शत्रु राष्ट्राचा अन्न पुरवठा तोडणे हा महत्त्वाचा उपाय राहिलेला आहे.)

खत, कीटकनाशक, इत्यादि परकीय आयात विरहित सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देऊन क्युबा देश आपले सार्वभौमत्व टिकविण्यासाठी अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी झाल्याचे जगाच्या अलीकडील इतिहासात गौरविण्यात येते.

**शेतमालाचे न्यूनतम समर्थन मूल्य (हमीभाव किंवा एमएसपी)**

सन २००४-०५ च्या तुलनेत नऊ वर्षात सन २०१३-१४ मध्ये गहू आणि धानाचे न्यूनतम समर्थन मूल्य दुप्पट केल्याचा दावा 'भारतीय राष्ट्रीय काँग्रेस' ने आपल्या जाहीरनाम्यात केला आहे. अन्य काही धान्यांच्या बाबतीत हमीभाव तिपटीने वाढविल्याचाही दावा करण्यात आला आहे. शेतकऱ्यांना उत्तम मोबदला मिळावा यासाठी हमीभाव वाढवत राहण्याचे धोरण यापुढेही सुरू राहील अशी 'भारतीय राष्ट्रीय काँग्रेस'ची घोषणा आहे.

'कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सिस्ट)' आणि 'आम आदमी पार्टी' यांनी डॉ. स्वामिनाथन यांचे अध्यक्षतेखालील राष्ट्रीय कृषि आयोगाच्या शिफारसी लागू करण्याची घोषणा केली आहे. शेतमालाच्या लागत खर्चावर किमान ५० टक्के अधिकचा मोबदला मिळवून देण्याची राष्ट्रीय कृषि आयोगाची शिफारस 'कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सिस्ट)' ने आपल्या जाहीरनाम्यात विशेषत्वाने नमूद केली आहे

'भारतीय जनता पक्ष' देखील उत्पादन खर्चावर किमान ५० टक्के अधिकचा मोबदला मिळवून देण्याची घोषणा करतो.

म्हणजे, शेतमालाचे न्यूनतम समर्थन मूल्य वाढविण्याबाबत सर्व पक्षीय मतैक्य असल्याचे दिसते

मूल्यनिर्धारणाचे समीकरण (फार्म्युला) राष्ट्रीय कृषि आयोगाच्या शिफारसी प्रमाणे उत्पादन खर्चावर किमान ५० टक्के अधिकचा मोबदला देण्याचे असावे यासंबंधी बहुमत अनुकूल असल्याचे दिसते 'भारतीय राष्ट्रीय काँग्रेस' मात्र याबाबतीत मोघम आहे.

जाहीरनाम्याप्रमाणे सर्वपक्षीय सहमती असो किंवा बहुमत, शेतमालाचे न्यूनतम समर्थन मूल्य वाढविण्याचा कार्यक्रम सोळाव्या लोकसभेला प्राथमिकतेने हाताळता येईल, ही शेतकऱ्यांसाठी आशादायक बाब दिसते. असे असले तरी यासंबंधीचे काळजीचे मुद्दे चर्चेला येणे जरूरीचे वाटते

**न्यूनतम समर्थन मूल्य सूचविणारी संस्था**

राज्य व केंद्र शासनाचे कृषि विभाग, नियोजन आयोग, आणि 'कृषि लागत व मूल्य आयोग' (कमिशन फार एग्रिकल्चरल कास्ट्स एण्ड प्राईसेस), इत्यादि अनेक संस्था शेतमालाच्या उत्पादन खर्चाचे आपआपल्या परीने आकलन

करीत असतात. उत्पादन खर्चाच्या आधारे राज्यांनी सूचविलेल्या न्यूनतम समर्थन मूल्यावर भाष्य करून केंद्रीय स्तरावर अंतीम अहवाल निर्मीतीचे काम 'कृषि लागत व मूल्य आयोग' करीत असतो.

सर्वसाधारणपणे 'कृषि लागत व मूल्य आयोग'चे अहवाल व शिफारसींना न्यूनतम समर्थन मूल्य निर्धारणात जास्त अधिकृत मानले जाते. असे असले तरी 'कृषि लागत व मूल्य आयोग'चे अहवाल व शिफारसी स्वीकारणे हे मात्र भारत सरकारवर बंधनकारक नाही.

शेतकऱ्यांच्या जगण्याशी सरळ संबंधीत या गंभीर मुद्द्यासंबंधाने भारत सरकारची अधिकृत, पारदर्शी, सर्वसमावेशक, निर्णयक्षम, सर्वोच्च संस्था अस्तित्वात नसणे शेतकऱ्यांसाठी फार धोक्याचे आहे. उत्पादन खर्च किंवा न्यूनतम समर्थन मूल्य निर्धारण संबंधी काही आक्षेप नोंदवायचे असल्यास शेतकऱ्यांना संधी देण्याची व्यवस्था (ग्रिव्हेन्स रिड्रेसल) अस्तित्वात नाही.

**शेतमालाच्या उत्पादन खर्चाचे निर्धारण**

'कृषि लागत व मूल्य आयोग'च्या आजच्या कार्यप्रणाली प्रमाणे शास्त्रीय पद्धतीने आकलन करून देणाऱ्या दीर्घ प्रश्नावलीच्या आधारे नमुना सर्वेक्षण करून स्थानिक स्तरावरील माहिती मिळविली जाते; आणि जिल्हा, विभाग, राज्य असे अनेक स्तरावर ती माहिती एकत्रित केली जाते. ठराविक पीकाचे दर हेक्टरी आणि दर क्विंटल उत्पादन खर्च, आय-व्यय तफावत, बाजाराचा कल, इत्यादि १२ मुद्द्यांचे सखोल अध्ययन करून शेतमालाचे न्यूनतम समर्थन मूल्य ठरवले जाते. परंतु 'कृषि लागत व मूल्य आयोग'च्या शास्त्रीयतेवर सामान्य शेतकरी व अनेक तज्ज्ञ मंडळींना आक्षेप आहेत.

जैव, भौगोलिक, सांस्कृतिक, इत्यादि अनेकोविध विविधतता असलेल्या भारत देशाच्या विशाल भूभागात केवळ नमुना सर्वेक्षणाच्या आधारे प्रत्येक हंगामात विशिष्ट पीकाबाबत प्रति क्विंटल व प्रति हेक्टर अपेक्षित लागत मूल्य निर्धारण करणे शास्त्रीय दृष्ट्या अत्यंत क्लिष्ट काम आहे. एकाच पीकाच्या बाबतीत अगदी जवळ-जवळच्या गावलगतच्या शेतात येणाऱ्या उत्पादनात कमालीची तफावत असल्याचे अनुभवास येते. देशाच्या पातळीवर ही तफावत फार मोठी असायला हवी. 'कृषि लागत व मूल्य आयोग' असे तफावतीचे गणन ('वेरिएबल', उदाहरणार्थ +- १० टक्के) करीत असल्याचे आढळत नाही.

पीकविम्याचा खर्च आयोग गृहीत धरतो परंतु पीकविमाच्या अधिकारक्षेत्रात नसलेली व्यक्तीगत पीक उत्पादनावर विपरीत परिणाम करणारी 'जोखीम' आयोगाच्या गणनेत नाही. हवामानातील बदल (क्लायमेट चेंज, जसे - पाऊस जुन-जुलै ऐवजी ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये बरसणे); सुका दुष्काळ, ओला दुष्काळ, टोळधाड, इत्यादि अचानक येणारी नैसर्गिक आपत्ती; आणि नीलगाय, डुक्कर, इत्यादि जनावरांमुळे होणारे पीकाचे नुकसान; अशी उत्पादन संबंधी जोखीम विचारात घेतली जात नाही.

शेतकऱ्यांना सामना करावा लागत असलेल्या ६ प्रकारच्या जोखीमांचा भारताचे नियोजन आयोगाच्या तज्ज्ञ समितीने अतिशय अभ्यासपूर्वक विवेचन केले आहे. जोखीम व्यवस्थापन संबंधी होणाऱ्या खर्चाबाबत 'कृषि लागत व मूल्य आयोग' विचारच करीत नाही.

शेतकऱ्याच्या कुटुंबातील सदस्यांनी स्वतः आपल्या शेतात मजुरी कामे केल्यास ते देयकामध्ये मोजण्याची पद्धत आयोगाने ठरविली आहे. परंतु स्वतः शेतकरी जो आपल्या शेतात मजूर म्हणून राबतो, अन्य मजुरांवर सुपरवायझर म्हणून पाहणी करतो, त्याचवेळी व्यवस्थापक म्हणून शेतीचे एकुण व्यवस्थापन करतो, त्याचा मजुरी दर शेतमजुराऐवढाच असणे कसे योग्य आहे?

शेतीच्या कामानिमित्त्य वर्षभरात कितीतरी वेळा शेतकऱ्याला तलाठी, बँक, तहसील, अश्या सरकारी कार्यालयांच्या फेऱ्या कराव्या लागतात. वैध फी देऊन किंवा 'अतिरिक्त' फी देऊन कागदपत्र गोळा करावे लागतात. या प्रशासकीय-व्यवस्थापकीय आणि आकस्मिक (कन्टिनजेन्सीज) खर्चांची सोय पीकाच्या लागत खर्चामध्ये आयोग करीत नाही.

लागत खर्चाच्या गणनेत आयोगाने एकुणएक खर्च सामील केलेले नाहीत असे अनुभवी शेतकऱ्यांचे मत आहे. पोते शिवण्यासाठी लागणारी दाभण-सुतळी पासून अनेक छोटेमोठे खर्च त्यातून सुटले आहेत शेतकऱ्याला रात्रीच्या राखणदारीतला सोबती किंवा स्वतः इमानी चौकीदार असलेल्या पाळीव कुत्र्याचे जेवण खर्च (एका प्रौढ व्यक्तीपेक्षा किंचीत जास्त) कौटुंबिक खर्चाचा भाग नाही तर शेती खर्चाचा भाग आहे, असे आयोगाला माहीत नसल्याचे लक्षात येते.

उत्पादन खर्च निर्धारणाची पद्धत त्रुटीपूर्ण असल्याने त्याआधारे ठरविण्यात आलेले न्यूनतम समर्थन मूल्य न्याय्य असू शकत नाही.

सोळावी लोकसभा शेतमाल उत्पादन खर्च निर्धारणाच्या पद्धतीमधील त्रुटी दूर करण्यासाठी प्राथमिकतेने उपाय योजना करेल याची खात्री हवी.

**शेतकऱ्यांसाठीचा किमान नफा**

'कृषि लागत व मूल्य आयोग'च्या पद्धतीप्रमाणे न्यूनतम समर्थन मूल्य निर्धारण करतांना लागत खर्चावर १५ टक्के नफा गृहीत धरला जायचा आता सर्वपक्षीय बहुमताप्रमाणे 'किमान' ५० टक्के नफा गृहीत धरला जाईल (!). यासाठी राजकीय पक्षांचे अभिनंदन!

जाहीरनाम्यात या पक्षांनी 'किमान' शब्द उपयोगात आणला आहे. याचा अर्थ गरज भासल्यास हा नफा १०० टक्के किंवा त्यापेक्षाही जास्त गृहीत धरायला हवा नफा संदर्भात शेतकऱ्यांची खरी गरज किती याचा विचार होणे जरूरीचे आहे.

राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण २०१० (नॅशनल सॅंपल सर्वे) अहवालानुसार शेतकरी कुटुंबांचे मासिक उत्पन्न सरासरी २००० रूपये पेक्षा थोडेसे जास्त आहे.

भारतात लागू असलेल्या किमान वेतन कायद्याप्रमाणे एखाद्या व्यक्तीला ऐवढे कमी उत्पन्न देणे कदाचित मालकाला दंडनीय अपराधाचे ठरले असते.

कोणीही म्हणेल की किमान वेतन कायदाचे तत्व येथे लागू होत नाही कारण शेतकरी हे नोकरदार नसून स्वतंत्र व्यवसायिक आहेत. परंतु शेतकऱ्यांच्या संदर्भात भारतातील वेगळी वास्तविकता आपल्याला समजून घ्यावी लागेल.

शेतमालाची किंमत निर्धारीत करण्याचे सर्वाधिकार सरकारने स्वतःकडे राखून ठेवल्याने भारतात शेती व्यवसायाला 'स्वतंत्र व्यवसाय' म्हणून प्रतिष्ठा नाही. शेती वगळून अन्य कुठल्याही व्यवसायात सरकार किंमत निर्धारण करीत नाही, हे लक्षात घ्यायला हवे. म्हणजे शेतकरी हे एका अर्थाने सरकारचे बांधील नोकरदार आहेत

त्यामुळे सरकारी वेतन आयोग निर्धारीत करीत असलेल्या वेतनश्रेणी मध्ये शेतकऱ्यांना स्थान देणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांना देय नफ्याची टक्केवारी त्याआधारे ठरविली जावी.

महत् कष्टाने साध्य व प्रस्थापित झालेली भारताची लोकशाही टिकविण्यासाठी आर्थिक समानता कडे लक्ष देण्याचा मोलाचा इशारा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दि. २५ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताच्या संविधान सभेत भाषण करतांना दिलेला होता. आजच्या कमालीची आर्थिक विषमता पोसलेल्या काळात सोळाव्या लोकसभेने शेतकऱ्यांना आर्थिक उन्नतीचे मार्ग खुले करणे लोकशाहीसाठी हिताचे ठरेल

दि. १४ एप्रिल २०१४, डॉ. आंबेडकर जयंती.

(दैनिक लोकसत्ता, मुंबई; दि. 16 एप्रिल 2014 रोजी प्रकाशित)

---

राहुल बैस, 'स्वराज्य-मित्र', मु.पो. अंजनगावबारी, व्हाया बडनेरा, ता.जि. अमरावती, पिन-४४४७०१.

दूरभाष संपर्क क्र. ९४२३१०२९८३, ईमेल rahulbais@gmail.com